(18)

2021-22
Smp

330


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका


(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस – सव्वीसावा
जानेवारी–फेब्रुवारी–मार्च, एप्रिल–मे–जून २०२१

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' –
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
● Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC ● ISO मानांकन 9001:2015 ●
ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे




शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्तामापित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**● संपादक ●**

**प्रा. (डॉ.) शिवकुमार सोनाळकर**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**● अतिथी संपादक ●**

**डॉ. मिलिंद हुजरे**

प्राचार्य, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली

**डॉ. तातोबा बदामे** **डॉ. शहाजी पाटील**

**● कार्यकारी संपादक ●**

डॉ. नीला जोशी

**● संपादक मंडळ ●**

प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे डॉ. गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदमे डॉ. दिनेश वाघुंबरे

**● सल्लागार समिती ●**

डॉ. राजन गवस डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**● प्रकाशक ●**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८.

**मूल्य: ₹ ३००**

संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

| | | |
|---|---|---|
| जकिरा : विवाहपूर्व विधीचा लोकाविष्कार | अनंता मच्छिंद्र कासुरे | ११० |
| वीरशैव धर्मातील लोकविधिंचे स्वरूप | डॉ. गांतेश हिरेमठ | ११३ |
| कऱ्हाड परिसरातील लोकदैवतांचे ऐतिहासिक महत्त्व | डॉ. सुहासकुमार बोबडे | ११७ |
| मुस्लीम स्त्रियांच्या जात्यावराच्या ओव्या | डॉ. आर. के. शानेदिवाण | १२० |
| आदिवासी लोकगीत – कामड नाचाची गाणी. | गजानन चव्हाण | १२५ |
| जागरण– गोंधळ यांमधील परस्पर साम्य भेद | संगीता प्रकाश साळुंखे | १२८ |
| आदिवासी लोकगीतातील निसर्ग संस्कृती | स्नेहल जयराम सावळे | १३० |
| पोतराज : लोककलासंस्कृतीचा एक उपासक | धनाजी उर्फ धनंजय सोमनाथ मिसे | १३३ |
| भोंडला भुलाबाई : स्त्री गीतांचा अमूल्य ठेवा | डॉ. प्रतिभा प्रदीप पाटणे | १३६ |
| महादेव कोळी आदिवासी महिलांचा मौखिक आविष्कार | सुमन बगाड | १३९ |
| व्रतकथा – लोकसंस्कृतीचे एक आविष्कार रुप | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १४१ |
| बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील कृषीसंस्कृती आणि लोकजीवन | डॉ. सविता माधवराव पवार | १४४ |
| वडार समाज लोकगीतातून उलगडणारी स्त्रीरूपे | सौ. विजयालक्ष्मी विजय देवगोजी | १४७ |
| जातक कथा एक मौखिक अविष्कार | वर्षा बाळासो तांदळे | १४९ |
| लोकसंस्कृतीचा उपासक पोतराजाचे प्रयोगरुप | माधवी सुरेंद्र पवार | १५२ |
| निसर्गपूजक आदिवासींची लोकसंस्कृती | रघुनाथ चंदर गवळी | १५६ |
| मल्हारी महात्म्यातील लोकदैवत: खंडोबा | डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५९ |

# बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील कृषीसंस्कृती आणि लोकजीवन

डॉ. सविता माधवराव पवार
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय, मेहकर

**प्रस्तावना :**

साहित्याच्या मौखिक आणि लिखित अशा दोन परंपरा मानल्या जातात. लक्षात घेतले तर बहिणाबाईची गाणी मौखिक परंपरेतील सर्वोत्कृष्ठ निर्मिती आहे. त्यांनी गाणी रचली, ओव्या रचल्या. विविध भाषिक रूपे घडविली. पण यातले काहीही लिखित स्वरूपात त्यांनी लिहिले नाही. हया रचना त्यांनी केव्हा केल्या याचा कोणत्याही प्रकारे कालनिर्देश नाही. त्यांच्या हया रचना तोंडी असत. सोपानदेव यांनी यथावकाश त्या रचना लिहून काढल्या असाव्यात, म्हणजे या गाण्यांना मौखिक रूप दिले ते बहिणाबाईनी आणि लिखित रूप दिले ते सोपनादेवांनी.

मार्गशीर्ष महिन्यात पिकाची कापणी करावी लागते, या दिवसात जमीन भेगाळलेली असते, पिवळे पिवळे शेत कापणीची वाट पाहत असते, बहिणाबाई आपल्या काव्यातून कापणी, मळणी, उपननी या कृषीविषयक कामाचे तन्मयतेने आणि साग्रसंगीत वर्णन करतात. आता शेताची राखण करण्याचे काम संपलेले आहे, त्यामुळे गोफणीचे आता काम राहिले नाही. पण आता विळयाचे काम असल्यामुळे तो लावून ठेवावा लागतो. कापणी झाल्यानंतर रगडणी म्हणजे मळणीचे काम चालू होते, खळे राखून तयार करावे लागते. मध्ये मेढ उभारून बैलांच्या साहाय्याने मळणी केली जाते. त्याच्या पायाच्या पुण्याईने कणसांतून पसापसा दाणे पडायला लागतात.

मळणीनंतर 'उपननी' या कामाला शेतकरी लागतो. वाऱ्याची दिशा पाहून तिवईवर उभे राहून पाटया हातामध्ये घेऊन मळणी केलेले धान्य उपनावे लागते. या कामासाठी वारा मात्र चांगला वेगात असायला हवा. 'मोट हाकलतो एक' या कवितेमध्ये विहीर, मोट्टा, नाडा, आणि बैलांचे मोट ओढणे याचे वर्णन बहिणाई करतात. असे कष्ट घेऊन मोटीद्वारे पिकाला पाणी दिले जाते. पेरणीतून पिक घरी येईपर्यंतच्या सर्व कामांची आणि कष्टाची वर्णने त्या करतात आणि कृषीसंस्कृतीचे दर्शन आपल्याला घडते. या प्रत्येक कामामागे जोडीला कृतार्थतेच्या भावभावनाही असतात. 'ईश्वराची करणी' म्हणून त्या नतमस्तक आहेत.

**बहिणाबाईंच्या कवितेतून दिसणारे लोकजीवन :**

बहिणाबाई परंपरेने चालत आलेल्या लोकगीताऐवजी आपली स्वतःचीच गीत म्हणत असत. लग्नसमारंभात स्त्रिया एक गाणं म्हणत असत – ''नवरा नवरी ग कश्शी न्हाते, तेच पानी ग वनी जाते,'' हयाच्या पुढे पाण्याच्या गाडया चालल्या आहेत, हांडेच्या हांडे भरून येताहेत, घागरीवर घागरी गंगाळात पडताहेत नवरा–नवरी न्हाताहेत. असे तेच ते कडवे पुनः पुन्हा म्हणत असत. परंतु तेच पाणी वनात जाते आणि मग पुढे काय होते, ते बहिणाई स्वतःच्याच शब्दांत सांगतात ते असे–

'' नवरा नवरी ग कश्शी न्हाते



ISSN No. 2319-6025

तेच पानी ग वनी जाते
वनी फुल्लल्या जाई जुई
मोहरल्लीय आंबराई
त्यात कोकिया गानं गाते
जल्मा-जल्माचं जडे नाते
नवरा नवरी ग कशी न्हाते
तेच पानी ग वनी जाते ''३

'आदिमाये' चे वर्णन बहिणाबाई 'येडीमाय' म्हणून करतात. लोकजीवनात या आदिमायेला फार महत्व पण बहिणाबाईला मात्र तिच्या वागण्याविषयी प्रश्न पडतात. स्त्रीच्या जीवनात 'माहेरा' ला महत्व फार माहेराच्या माणसांची प्रेमाने त्या वर्णने करतात, माहेराचा रस्ता हा 'तापीसनी लाल' झाला असला तरी पायाला मात्र तो मखमलीसारखाच वाटतो. माहेरच्या 'लौकी', नदीला बहिणाबाईच्या माहेराला जाण्यायेण्याच्या खेपा माहित आहेत, बहिणाबाईंनी वर्णन केलेल्या खेडयामध्ये दुधदुभत्याची कमतरता नाही, शेतीबरोबर गाई म्हशींची खिल्लार सुद्धा लोक पाळतात, बैलगाडयांनी प्रवास केला जातो, बाजारासाठीही बैलगाड्यांचा वापर होतो, पाहुणचार म्हणून गुळाच्या पोळया केल्या जातात. ज्वारी, कपाशीचे, बाजरीचे पीक शेतकरी घेतात. कष्टाचा संसार मात्र तो समाधानाने करतात. संसार म्हणजे 'जसा तवा चुल्ह्यावर, आधी हातले चटके, तव्हा मियते भाकर', याची त्यांना जाणीव आहे.

स्त्रियांना फार कष्टाची कामे करावी लागायची. डोक्यावर पाणी भरणे, जात्यावर दळण दळणे आदी कामात दिवस कसा संपायचा ते कळायचे नाही आज जाते दिसत नाही पण बहिणाबाईंच्या काव्यातून जात्याची 'घरघर' घराघरांतून ऐकायला मिळते. त्या म्हणतात.

''अरे, घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटी''४

आज न दिसणाऱ्या 'कणग्यां' चे वर्णन बहिणाबाई करतात. तळहात पाहणारा जोतीषीगावोगावी जाताना दिसतो. बहिणाबाईंचा मात्र अशा भविष्यकथनावर विश्वास नाही. त्यांचा आपल्या कर्मावर विश्वास आहे. वैधव्य आल्यानंतर बांगडया फोडल्या जातात, कुंकू पुसले जाते पण 'गोंधन' मात्र मागे राहते. मनगटात 'करतूत' असली म्हणजे संकटावरही मात करता येते. ज्योतिषी जसा गावात येतो तसाच 'रायरंग' म्हणजे बहुरूपीही येतो. पण या बहुरुप्याविषयी बहिणाबाईंच्या मनात आस्था आहे. त्याच्या गुणाची आपण कदर केली पाहिजे कारण तो लोकरंजन करतो आणि हसवता हसवता लोकांच्या डोळयांत अंजन घालून प्रबोधनाचेही काम करतो. पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शनही येथे घडते. विठ्ठलाच्या मंदिरात संत तुकारामांचे अभंग ऐकायला येतात. भजनकीर्तनात माणसे दंग होऊन जातात. आधी हाडे मोडेपर्यंत घाम गाळला आहे तेंव्हा आता टाळया वाजवून हरीनाम घ्यायला काही हरकत नाही.



330

पंढरीची दिंडी गावातून जाते. वारकरी थंडीवाऱ्याची, पाण्यापावसाची पर्वा न करता दिंडीत सहभागी होतात.

गावामध्ये काहीवेळा 'अनागोंदी कारभार' ही पाहायला मिळतो. आण्णा महाराजासारखे सत्प्रवृत्त लोकही भेटतात. प्लेग, खोकल्यासारखे आजार गावावर आलेले दिसतात. जडयाबुटया देणारे वैद्य, गोसावी भेटतात. 'महारवाडया' ची येथली वस्ती येथे आहे. महार हे गावातल्या पाटलांचे हुकुमाचे ताबेदार आहेत. पोळा, अक्षय तृतीया, गुढीपाडवा, नागपंचमी यासारख्या सणांची वर्णने आली आहेत. गुढी उभारणीला गुढी 'पाडवा' म्हणणे बहिणाबाईना योग्य वाटत नाही. अक्षय तृतीयेला म्हणजे आखजीला मुली माहेराला येतात आणि आंगणात दंग होऊन खेळतात, झिंगा, फुंगडयांचा खेळ खेळला जातो. गौराई सजवल्या जातात. टिपऱ्यांचे खेळ खेळले जातात. पोळयाच्या सणाला पुरणपोळीचा खुराक बैलांना दिला जातो. नागपंचमीला नागोबाची पूजा केली जाते, दुधाचा नैवेध त्याला दाखवला जातो. माहेरवाशीणी स्त्रिया जशा येथे दिसतात, त्याचप्रमाणे सासुरवाशिनी स्त्रियाही दिसतात, कृषीसंस्कृतीतील लोकजीवनांचे प्रतिबिंब बहिणीईंच्या काव्यातून अशातऱ्हेने दृगोचर होते.

**समारोप**

बहिणाबाईंच्या कविता हया एक प्रकारे मौखिक स्वरूपातील काव्यच म्हणता येईल. लोकगीताचा बाज त्यांच्या काव्यात दिसतो, बहिणाबाई स्वतः कृषककन्या, निसर्गकन्या. संवेदनशील मनाच्या बहिणाबाईंनी कृषीसंस्कृतीचे पुरेपूर दर्शन आपल्या काव्यातून घडविले आहे. पाऊसपाणी, शेती, शेतीची अवजारे, काबाडकष्ट, पेरणी, कापणी, मळणी, उपनणी, बैलगाडी, बाजार, धान्य, आदीचे चित्रण जसे त्यांच्या काव्यातून येते, त्याचप्रमाणे सणवार, उत्सव, पंढरीची वारी, देवदेवता, नातेसंबंध, सासर- माहेर, मुलींचे खेळ, आजार अशा स्वरूपात लोकजीवनाचे दर्शनही घडते, समृद्ध कृषीसंस्कृतीचे दर्शन होताना कष्टमय जीवनही येथे पाहायला मिळते.

**संदर्भ टिपा :**

१) बहिणाबाई चौधरी, बहिणाबाईची गाणी, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना, मुंबई, चौदावी आवृत्ती२००९,पृ. क्र. ८.
२) बहिणाबाई चौधरी, बहिणाबाईची गाणी, मुंबई, चौदावी आवृत्ती २००९,पृ. क्र. १४१
३) तत्रैव, पृ. क्र. ८३
४) तत्रैव, पृ. क्र. १२६.

Coordinator – IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar,Dist.Buldana



ISSN No. 2319-6025